
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : ......बा.वा.......
दा. क्र. : २९१८
BVBK-0402919

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा वा
क्र. २०७९

# नशिबांची गोष्ट

दत्ता सरदेशमुख



ओ.वा.
२८९८
१८/२/९४

"ऑपरेशन ब्लॅक बोर्ड योजनेखालील पुस्तक - १९९२-९३"

# नशिबांची गोष्ट

दत्ता सरदेशमुख

म. वं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 2898 दिनांक 18/2/94
विषय ओ.वा. ...

BVBK-0402919

चेतश्री प्रकाशन
मुक्ताई, धुळे रोड,
अमळनेर

● प्रकाशिका : सौ. य. वा. सोनार
चेतश्री प्रकाशन,
मुक्ताई, धुळे रोड,
अमळनेर ४२५४०१

● © लेखकाधीन

● मुखपृष्ठ : मिलींद जोशी, मुंबई

● मुद्रक : श्री. सुनिल अंबिके
श्री. समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११ ००१

मूल्य : रु. १०/-

म. वं. सं. कर्वे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क. २०१८ दिनांक १८/२/८४
विषय बा. वा. ... क. ........

# : १ : खरा मित्र

अविनाश नेहमीप्रमाणे शाळा सुटल्यावर घरी येत होता. वह्या, पुस्तकं, डबा अशा साहित्याने भरलेलं दप्तर त्याच्या पाठीवर होतं. आज त्याला जेवण फारसं करावं वाटलं नव्हतं. डब्यात एक चपाती तशीच शिल्लक होती शाळेत त्याला मित्र असा कोणीच नव्हता. अविनाश थोडे अंतर शाळेपासून चालून आला.

एका कुत्र्याचं पिलू बऱ्याच वेळापासून त्याच्या मागे मागे येत होतं अविच्या ते लक्षात आलं. तो थांबला. पिल्लू त्याच्याकडं बघत उभं होतं. डब्यात उरलेली चपाती काढून त्यानं त्या कुत्र्याकडे टाकली. कुत्रा आनंदाने चपाती खाऊ लागला. अधून मधून अविकडे पाहून शेपटी हलवू लागला. अविला वाटलं, बिचारा भुकेला असणार.

चपाती खाऊन झाली कुत्र्याने अविचा पिछा काही सोडला नाही. आता शेपूट हलवीत त्याच्या पायात घोटाळत, त्याच्या बरोबर चालू

लागला. दोनतीन महिन्याचं ते पिल्लू मोठं गोंडस होतं. शरीरानं गुब-गुबीत. अंगावर लाल रंगाचे लांबलचक मऊ मऊ केस. कपाळावर गोलाकार शुभ्र केसांचा चट्टा, अविला ते पिल्लू मनातून खूप आवडलं. त्याला घरी घेऊन जावं असा विचारही त्याच्या मनात आला. पण बाबांना हे आवडेल का ? ते काय म्हणतील ? ह्याची काळजी वाटू लागली.

अवि पाहता पाहता घराजवळ आला. त्याचं घर तसं गावापासून थोडंसं दूरच होतं. आसपास चार-पांच बंगलेच फक्त होते. अविचे आई आणि बाबा दोघेही नोकरी करीत असत. दहाला ऑफीसाला गेले की संध्याकाळी घरी यायला त्यांना सहा तरी वाजायचे. शाळा सुटली की, बाबा आई येईपर्यंत दुपारी बारापासून घरी एकटा अवि असायचा. तो एकुलता एक मुलगा.

घर लांब असल्यानं अविला खेळायला कोणी मित्रही मिळत नसत. आज मात्र त्याला मित्र मिळाला होता. त्या पिल्लाचे त्यानं नांव ठेवलं 'लाल्या'

अविनं घराचे दार उघडले. लाल्या दाराजवळच घुटमळू लागला. अविनं त्याला उचलून आंत नेलं. आपल्यासाठी ठेवलेलं दूध त्याला प्यायला दिलं. चुपूकऽऽ चपूकऽऽ आवाज करीत लाल्या दूध पितांना पाहून अविला मजा वाटत होती. हाही आपल्यासारखा एकटाच आहे. अविने त्याला सोडायचे नाही असा निश्चय केला. त्याच्या पाठीवरून तो हात फिरवू लागला. संध्याकाळपर्यंत त्याचा वेळ कसा गेला कळले नाही.

आई, बाबाच्या स्कूटरचा आवाज ऐकून अवि दार उघडायला गेला. लाल्या त्याच्या हातावर मोठ्या ऐटीत बसला होता. अविच्या

बाबांना मात्र कुत्रा, मांजर असे प्राणी आवडत नसत. त्यांनी थोड्या नाराजीनेच त्या दोघांकडं पाहिलं. घरात आल्यावर त्यांनी म्हटले अवि, कुठून आणलंस ते कुत्रं जा, सोडून ये त्याला.' आज लाल्याने त्याला किती प्रेम दिलं होतं एक दोस्त त्याला मिळाला होता. त्याला सोडा-यचं ? मळीच नाही !

'बाबा, आई ! तुम्ही दोघंही घरी नसता. दुपारपासून तुम्ही येई-पर्यंत मला कुणीच दोस्त खेळायला नाही. सोबत नाही. मला खूप कंटाळा येतो. लाल्या मला हवाय. मी नाही सोडणार त्याला' अवि अधून मधून बाबांकडे बघून बोलत होता. 'तुम्ही जर त्याला सोडायला लावलं तर मी अजिबात जेवणार नाही"

एकुलत्या एक मुलाच्या हट्टापुढे बाबांचाही नाईलाज झाला. त्यांनी परवानगी दिली आणि म्हणाले "हे बघ अवि स्वयंपाकघरात मात्र तो कुत्रा आलेला मला चालणार नाही."

बाबांनी परवानगी दिली म्हणून अविला खूप आनंद झाला. लाल्याही पुन्हा शेपूट हलवून घुसळू लागला. आपला आनंद व्यक्त करू लागला. अवि शाळेला चालला की लाल्या त्याला दारापर्यंत पोहोच-वायला जायचा. जणू कांही 'लवकर ये, वाट पाहतोय' असे भाव त्याच्या चेहऱ्यावर असत

लाल्या हळूहळू मोठा झाला. अविने त्याला चांगल्या सवयी लावल्या. चपाती पुढ्यात टाकली तरी लाल्या तोंड लावीत नसे. खा. खा, म्हटल्यावरच तो खात असे.

संध्याकाळी स्कूटरचा आवाज झाला की लाल्या कृतज्ञतेने घराकडे पळत जाई भॉऽऽ असं लाडाने भुंकत असे. पण बाबा कधी त्याला जवळ घ्यायचे नाहीत आईला तर फारसा वेळच नसे.

अवि, लाल्या यांची चांगलीच गट्टी जमली होती. आणि दारासमोर कधी चेंडू खेळत असला, की लाल्या तो तोंडात धरून आणून देत असे. लाल्याऽऽ अशी" हांक मारली, की लाल्या धावत जवळ येई. अविचा वेळ आता आनंदात जाऊ लागला. अविच्या पलंगाखालीच लाल्या झोपत असे.

दोस्तांनो, एकदा काय झालं, शनिवार, रविवार दोन दिवसांची सुट्टी असल्याने अविच्या आई बाबांनी जवळच्यात आंबराईत जेवायला डबे घेऊन जायचा बेत केला. त्यांच्या ऑफिसातले कांही मित्रही येणार होते. ठरल्याप्रमाणे ते आंबराईत जायला निघाले. पण बाबांनी 'लाल्याला बरोबर घेऊ नकोस.' असे अविला सांगितले. काय करावे ? त्याला कळेना. लाल्याशिवाय जाणे त्याला कसेतरीच वाटू लागले. बाबांची आज्ञा मोडणेही शक्य नव्हते. शेवटी तिघे स्कूटरवर बसून निघाले.

लाल्या काही कमी नव्हता. तो लपून छपून त्यांच्या स्कूटरमागे पळत निघाला. कुत्र्यांना आपल्या मालकांचा बरोबर वास येतो. आंबराईत सर्व मित्र मंडळी जमली. ते डबे उघडून मजेत जेवण करीत होते. तेवढ्यात अचानक जोराचा वारा सुरू झाला. वादळ उठले. भर दुपारी पावसाचे थेंब पडू लागले. विजांच्या कडकडाटाने सगळ्यांनाच मनातून भिती वाटू लागली. सगळ्यांनी पटापट डबे बंद केले आणि आडोशाला म्हणून एका मोठ्या आंब्याच्या झाडाखाली उभे राहिले. पाऊस कांही जोराचा नव्हता पण विजा मात्र धडाऽऽऽ धूमऽऽ आवाज करीत होत्या.

मागेमागे आलेला लाल्या आता थोडा भिजला होता. तोही आंबराईत झाडाखाली आला अविला त्याला पाहून खूप आनंद झाला. बाबांच्या आज्ञेचे पालनही झाले आणि लाल्याही न बोलवता बरोबर

आला.

आश्चर्य म्हणजे, लाल्या अविचा शर्ट धरून त्याला बाजूला खेचू लागला. हा असा कां ओढतोस ? हे अविला कळेना घाबरला असेल असे अविला वाटले. विजांचा कडकडाट चालत होता. लाल्या अविला खेचत होता. शेवटी अवि त्याच्या मागे गेला. काय गंमत आहे ? म्हणून सगळेच जण अविच्या मागे जाऊ लागले पावसाचे थेंब पडत होते. एवढ्यात विजांचा प्रचंड गडगडाट झाला. आंबराईत आलेली सगळी मंडळी ज्या झाडाखाली उभी होती नेमकी त्यात झाडावर वीज पडली. क्षणार्धात एवढे मोठे झाड जळून गेले. आगीचा डोंब उसळला होता.

लाल्याने सगळ्यांचे प्राण आज वाच वले होते. जसं काही तेवढ्यासाठी तो मागे पळत आंबराईत आला होता. सगळ्यांना लाल्याबद्दल आत्मीयता वाटू लागली. आता तो मान खाली घालून शांतपणे उभा होता. सर्वजण त्याच्याकडे कृतज्ञ मनाने पहात होते. अविने त्याला जवळ घेतले. तसे अविचे बाबा जवळ आले आणि त्यांनीही लाल्याच्या पाठीवर अत्यंत प्रेमाणे हात फिरवला. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू दिसत होते.

पाऊस थांबल्यावर सर्वजण आपआपल्या घरी परतले.

लाल्या मात्र अविचा जानी दोस्त तर झालाच पण तो आता आई-बाबांचाही लाडका झाला होता. निरपेक्ष प्रेम करणाऱ्या मित्रालाच जणू मित्रावरील संकटाची चाहूल लागते. हे या मूक प्राण्यानं सिद्ध करून दाखविले.

# : २ : अश्रूंचे झाले मोती

एका गावात एक ब्राम्हण कुटुम्ब रहात होतं. त्या गावात पडला दुष्काळ. ब्राह्मणाला कुठं पूजापाठाची आमंत्रणे येईनात. त्याचा संसार चालणं कठीण झालं.

एकदा ब्राह्मणाची बायको ब्राह्मणाला म्हणाली. "तुम्ही देवाची प्रार्थना करा. ध्यान करा. देव आपल्याला मदत करील." ब्राह्मण म्हणाला, " मी जंगलात जातो आणि पूजा प्रार्थना करतो. मला चार भाकरी बरोबर बांधून दे."

तो भाकरी घेऊन एका कपड्यात देव गुन्डाळून दूर गेला. देव बाहेर काढून पूजा केली ध्यानस्थ बसला. नंतर उठून बरोबर आणलेल्या भाकरी खाल्ल्या व पाण्याचा शोध करू लागला. काही अंतरावर त्याला धूर निघत असलेला दिसला. ब्राह्मण तिथे पोहचला. ती एका लोहाराची झोपडी होती. लोहार लोखंड तापवित बसला होता. त्याचे

पिळदार शरीर बघून ब्राह्मणाला वाटले, हा नक्की मदतही करील. ब्राह्मणाने लोहारला नमस्कार केला. पाणी मागितलं. लोहारानं एका लोटयात त्याला पाणी दिलं. लोहाराने एवढया दूर येण्याचं कारण विचारल्यावर ब्राह्मणाने आपली हकीकत सांगितली आणि म्हणाला आपण मला काही तरी मदत कराल का ?

लोहार म्हणाला, " माझी मुलगी कामिनी झोपडीच्या मागे आहे. ती तुम्हाला मदत करू शकेल."

ब्राह्मणाने मुलीला आशिर्वाद दिला. आणि आपली व्यथा तिला सांगितली. ब्राह्मणाची करूण कहाणी ऐकून भावनाशील कामिनी रडू लागली. आश्चर्य म्हणजे तिच्या डोळयातलं पाणी जमिनीवर पडले, की लगेच त्याचे मोती होऊ लागले. ती हसून म्हणाली, " हे मोती तुमच्या-साठीच आहेत, ते घ्या." कामिनी हसली तशी तिच्या तोंडातून चांदीची फुलं खाली पडली. ती फुलंही तिने ब्राह्मणाला घ्यायला सांगीतली. मग ती उठून चालू लागली, तर तिच्या प्रत्येक पावला-बरोबर एकेक सोन्याची मोहोर पडू लागली. ब्राह्मणाला ती म्हणाली, " ह्या मोहराही तुमच्याच मालकीच्या आहेत. त्या घेऊन जा."

ब्राह्मण आनंदाने घरी आला. ही सर्व संपत्ती कशी मिळाली ते त्याने आपल्या बायकोला सांगितले. पण बायकोचा अजिबात विश्वास बसेना.

वाटसरूला अडवून लुबाडले असेल, तो म्हणाली, "तुम्ही सांगता त्यावर माझा विश्वास नाही. तुम्ही गावच्या पाटलाला मला जे सांगितलेत, ते सांगा. त्यांनी विश्वास ठेवला तरच मी विश्वास ठेवीन."

ब्राह्मण पाटलाकडे गेला. बायकोला सांगितलेली सर्व हकिकत सांगितली. पाटलाला आनंद झाला. त्याने ब्राह्मणाला बक्षिसी देऊन

परत पाठवलं. बायकोचीही आता खात्री पटली.

काही दिवसांनी पाटलांनी ब्राह्मणाला बोलावले आणि सांगितले, की " भटजी त्या लोहाराच्या मुलीशी मला लग्न करायचे आहे "

" रावसाहेब, लोहाराने मान्य नाही केले तर ?" ब्राह्मण म्हणाला

" ते मला सांगू नका. माझं काम झालंच पाहिजे. "

विचारा ब्राह्मण पुन्हा लोहाराकडे गेला. भीतभती त्याने पाटलाचा निरोप सांगितला. आश्चर्य म्हणजे लोहाराने पाटलाची मागणी मान्य केली.

लग्न ठरले, मुहूर्त ठरला ब्राह्मणानेच लग्न लावले ब्राह्मणाला चांगली बिदागी मिळाली.

पाटील कामिनीला घेऊन घराकडे निघाले. ती पालखीत बसली होती. पाटलाच्या घरची एक मोलकरीण नवरीच्या सेवेसाठी पालखी बरोबर चालत होती. कामिनीला खूप तहान लागली.

ती मोलकरणीला म्हणाली, " मला खूप तहान लागली आहे. पाणी आणून दे. "

मोलकरणीच्या मनात पाप आलं होतं. ती म्हणाली, " मालकीण-बाई, समोरच एक नदी आहे, पण ते पाणी पिण्यासाठी कुणीच घेत नाही. त्याच्या शेजारी एक विहीर आहे ते पाणी पिण्यासाठी चांगलं आहे. "

' मग विहीरीचं पाणी घेऊन ये '

'बाईसाहेब त्या विहीरीत एक मोठा सर्प रहातो. माणसाचे दोन डोळे विहीरीत टाकल्याशिवाय तो पायरी उतरू देत नाही. मग पाणी कसं आण?'

नवरी म्हणाली, 'त्यात काय एवढं ? काढ माझे डोळे. टाक त्या विहीरीत. पण पाणी आण.'

आज्ञेप्रमाणे मोलकरणीने नवरीचे डोळे काढले.

मोलकरीण दुष्ट होती. कामिनीच्याच वयाची तिची मुलगी होती, तिचे लग्न झाले तर तर आपण श्रीमंत होऊ असे तिला वाटले. तिने तावडतोब आंधळ्या झालेल्या नवरीला एका पेटीत घातले. तिचे कपडे आपल्या मुलीला घातले. पालखीत बसवले आणि पेटी नदीत सोडून दिली.

मोलकरणीची मुलगी सुशिला आता पाटलाची बायको म्हणून वाड्यावर पोहोचली.

पाटलाने सुशिलाला हसायला, रडायला आणि चालायला सांगितले. पण मोती, चांदीची फुलं आणि सोन्याच्या मोहरा काहीच मिळाले नाही. पाटलांनी ब्राह्मणाला बोलावून म्हटले, 'तू आम्हाला फसवले.

ब्राह्मण घाबरून गेला. तरीही धीर करून म्हणाला, " नाही रावसाहेब, मी खोटं कशाला बोलू ? मुलगी इथे नवीन म्हणून असं झालं असेल."

इकडे लोहारच्या मुलीची ती पेटी एका कोळ्याच्या हाती लागली. तिची हकिकत ऐकून त्याला वाईट वाटले. तो तिला घरी घेऊन गेला, सांभाळू लागला अगदी आपल्या मुलीप्रमाणे. कामिनी हसली, रडली, फुलं आणि मोहरा पडू लागल्या. बघता बघता गरीब कोळी श्रीमंत झाला.

पुढे कोळ्याचे हे रहस्य एकाला कळले. पाटलाच्या बायकोला

अशा वस्तू हव्या आहेत असे त्याला कळले म्हणून त्याने कोळ्याला सांगितले. कामिनी जवळच होती. ती त्या माणसाला म्हणाली, ' मी या वस्तू पाटलाच्या बायकोला देईन. पण त्याची किंमत माणसाचे दोन डोळे घेईन म्हणून सांगा. '

त्या माणसाने पाटलाच्या बायकोला निरोप पोहचवला. सुशिलाची आई तिच्या जवळच होती. कामिनीचे दोन डोळे तिच्या जवळच होते. म्हणून तिने अट मान्य असल्याचे कळविले.

कोळी स्वतः पाटलाच्या वाड्यावर जाऊन मोती, फुलं, मोहरा, देऊन आला, आणि येतांना दोन डोळे घेऊन आला.

सुशिलाने त्या सर्व वस्तू पाटलाला दाखवल्या. पाटील खूष झाले.

इकडे डोळे बघून कामिनी कोळ्याला म्हणाली, ' दादा माझ्या युक्तीला यश आले. हे माझेच डोळे. आता हे डोळे माझ्या डोळ्यांच्या खाचात बसवा. आणि काजळ घाला. '

कोळ्याने तसे केले आणि कामिनीला पूर्वीप्रमाणे दिसू लागले. दृष्टी आली.

इकडे सुशिलाला मात्र पाटलाला रोज मोती, मोहरा काढून देणे शक्य नव्हते आणि कोळ्याला रोज दोन माणसाचे डोळे तरी कुठून देणार ? कामिनीला मात्र मोती वगैरे रोज काढणे शक्य होतं. कोळ्यांची श्रीमंती हळूहळू कामिनीमुळे वाढू लागली.

कोळ्याच्या अद्भूत मुलीची गोष्ट पाटलाला कळली. त्याने कोळ्याला ' एवढी संपत्ती ने एवढ्या थोड्या दिवसात कशी मिळविली असे विचारले.

कोळ्याने सारी हकीगत सांगितली. पाटलाला वस्तुस्थिती

समजली. सगळा उलगडा झाला. त्याने मोलकरीण आणि सुशिलाची फसवणूकीबद्दल गावातून गाढवावर मिरवणूक काढली.

ब्राह्मणाला बोलावून, त्याची क्षमा मागून पुन्हा कामिनीशी लग्न लावून देण्याची विनंती केली. कामिनीला आपली खरी जागा मिळाली. ती आणि पाटील आनंदाने राहू लागले.

(तामीळ लोककथेवर आधारित बालकथा.)

• •

# : ३ : नशिबांची गोष्ट

लाकडं सोडता सोडता आज खंड्या खूप दमून गेला. दुपारो बाराचे उन्ह डोक्यावर तापत होतंच. त्याला चक्कर आल्यासारखं वाटलं कारण सकाळपासून पोटात कांही गेलेलं नव्हतं. खंड्याच वयही आता पन्नासाजवळ आलं होतं पूर्वीसारखं काम त्याच्या हातून होत नव्हतं. कळायला लागल्यापासून खंड्याचा हाच उद्योग होता. दिवसभर लाकडं तोडावी आणि तिन्हीसांजेला तो भारा डोक्यावर आणून गावात विकावा. मिळतील ते आठ बारा आणे घ्यावे. गिरणीतून सर्व पिठाची मिसळ त्याला स्वस्तात मिळायची. प्रामाणिकपणे काम करणं एवढेच खंड्याला ठाऊक होतं. कधी कधी म्हणून त्यानं भावाबद्दल गिऱ्हाईकाशी घासाघीस केली नाही. खरं तर गिऱ्हाईकंही आता ठरून गेली होती. पाटल्याच्या वाड्यावर मोळी टाकली का पैसेही मिळायचे. पण पाटलीणबाई 'खंड्या, जाताना भाकर घेऊन जा रे बाबा' म्हणायची. खंड्या स्वत:हून कधीही मागायचा नाही. काल मात्र त्याला भाकरीही मिळाली नव्हती.

खंड्या झाडावरून उतरला. झऱ्याचं पाणी तोंडावर मारलं आणि वर पोटभर फक्त पाणीच प्याला. झाडाच्या बुंध्याला टेकून तो तसाच पडला. थकल्यामुळे त्याला लागली झोप. स्वप्नात त्याला एक पांढऱ्या शुभ्र दाढीचा तेजःपुंज साधू दिसला. तो साधू हसत हसत प्रसन्नपणे खंड्याकडे आला. ' काय खंडेराव कसे काय ? ' असे विचारू लागला. खंडेराव म्हणणारी ही पहिलीच व्यक्ती असेल. नाहीतर सगळे त्याला ' खंड्या ' म्हणत असत.

खंड्यान रागानच साधुला म्हटलं, 'कशाच काय चालायचं ? अहो ! इतकी वर्षे लाकड तोडतो, मेहनत करतो पण पोटभर अन्न नाही की नवा कपडा अंगाला नाही गोडधोड खाणे तर सोडाच काल शिळी भाकरी सुद्धा मिळाली नाही. अगदी वीट आलाय बघा या नशीबाचा. कसलं दळभद्री नशीब माझ्या वाट्याला आलंय कोण जाणे?

' कोण जाणे ? अरे मी जाणे ! ' साधू म्हणाला, ' खंडू तुला तुझ्या नशीबाची भेट घालून दिली तर काय करशील बरं ? '

खंडूला खूप आनंद झाला. तो म्हणाला, ' मला जर माझं नशीब भेटलं तर मी त्याला खडसावीन आणि एखाद्या श्रीमंत माणसाचं नशीब मला घेईन. भरपूर पैसे असले की सगळी सुखं मिळतात. '

" अस्सं ! चल तर माझ्याबरोबर मी तुला तुझ्या नशीबाची भेट घडवतो, ' साधू म्हणाला

खंडू साधूच्या मागे चालत राहिला. खूप खूप दूर गेल्यावर ते दोघे एका गुहेच्या तोंडाशी पोहोचले. साधू म्हणाला, ' या गुहेच्या आत अनेक छोट्या छोट्या गुहा आहेत. त्यातल्या दहाव्या गुहेत तुझं नशीब तुला भेटेल जा तू मी इथेच थांबतो.

नऊ गुहा ओलांडून खंडू दहाव्या गुहेजवळ गेला आंत खूप अंधार होता. एक मनुष्याकृती त्या अधारात गुडघ्यात डोके घालून बसली होती. खंडू जोरात म्हणाला, ' कोण आहे आंत ? '

' मी तुझं नशीब आहे ! ' आतून आवाज आला. बऱ्याच वर्षांचा राग खंडूच्या मनात होता. तो चिडून म्हणाला, ' अरे फुटक्या नशीबा इतकी वर्षे या इथे बसलास. माझा छळ होतो कधी माझा पिछा सोडणार आहेस. माझ्याच पाठी का लागलास ? चैन, चांगल अन्न, कपडे काहीच उभ्या आयुष्यात नाही दिलस मला, स्वतः अंधारात बसलास आणि माझ्या आयुष्यात अंधार करून ठेवलास. मी तुला खूप कंटाळलोय, खूप चीड येते मला तुझी. '

खंडचाचं नशीब म्हणाले, ' बाबारे मलाही तुझा कंटाळा आलाय. तुझी इच्छा असली तर तू मला सोडू शकतोस. इतर गुहामधून अनेक नशीबे आहेत. त्यांच्याकडे बघ जरा. हवं तर घे बदलून पण एक लक्षात ठेव. मी तुला चांगली धडधाकट देहयष्टी दिली. कधी आजारपण नाही. प्रेमळ बायको, दोन गोजिरवाणी मुलं तुला दिली, कष्टाची भाकरी तरी तू खाऊ शकलास तो माझ्यामुळेच. पण तू असंतुष्ट आहेस. नेहमी मला शिव्या देत राहिलास. आजही भेटलास तर शिव्याच तर देतोयस. तरीही मी मात्र तुझ्यावर रागावणार नाही. '

हे बोलणं ऐकून इतर गुहांमध्ये बसलेली अनेक नशीबं खंडूच्या भोवती जमली आणि म्हणाली, 'काय खंडू तुला आमचं नशीब हवंय कां ? बदलून घेतोस का ?'

भरजरी कपड्यातल्या त्या नशीबांकडे बघून खंडूला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, "तुम्हाला काय कमी आहे ?"

एक नशीब म्हणालं, "मी आहे शेठ जेठामलचं नशीब. भरपूर

पैसा आहे, जमीनजुमला आहे, दुध-दुभतं आहे, शर्टाला मी सोन्याची बटण लावतो पण बाबारे माझी मुलंच जगत नाहीत त्यामुळे मी दुःखी आहे. शेवटी हे सगळं घेऊन करू काय ? वंशाला दिवा नाही. माझी मुलं मेली"

दुसरं नशीब म्हणालं, 'फार मोठा व्यापार आहे माझा, परदेशातही व्यापार करतो. मी आहे बाटलीवालाचं नशीब. कधी तोटा सोसला नाही पण घरात मात्र सुख नाही व्यापारापायी मी धड बायकोशी बोलूही शकत नाही. वेळच नसतो. त्यामुळे ती सारखी भांडते. अपमान करते."

तिसरं नशीब होतं एका सुन्दर तरुणीचं. अत्यंत देखणी तरुणी ! खंडूला वाटलं हिला काय दुःख असेल.

ते नशीब बोलू लागलं, "खंडू माझं नाव कमल, कमळाच्या फुलासरखं सौंदर्य माझ्या वाट्याला आलं आहे पण कमळ जसं चिखलात उमलतं तसं मी .एका गरीब कुटुम्बात जन्म घेतला. वयात आल्यावर अनेकांच्या वाईट नजरा माझ्यावर खिळल्या गावगुंडांनी मला पळवून नेलं. माझं शील हरवलं सर्वस्वच गेलं.' सौंदर्यानेच घात केला रे बाबा.'

चौथं नशीब पुढे आलं, म्हणालं, "मी आहे रेलूमल सावकाराचं नशीब. अनेक गरीबांचे संसार उध्वस्त करून मी पैसा कमावला, पण रात्रभर शांत झोप नाही लागली कधी. गरीबांच्या तळतळाटानेच मला संधीवात झाला. हातपाय आखडून गेले."

राजा विक्रमसिंगाचं नशीब पुढं आलं. म्हणालं, "राजबिंड रूप आणि पराक्रम माझ्याजवळ आहे, पण सख्ख्या भावाचा खून करून मी गादीवर बसलो आता माझेच पुतणे माझ्या काटा काढतील अशा

भितीनं खाल्लेलं अन्नही अंगी लागत नाही. शिवाय युद्धात ज्यांची राज्ये जिंकली ते केंव्हा सूड घेतील याची काळजी असते."

खुद्द राजालासुद्धा सुख नाही हे बघून खंडूला आश्चर्य वाटलं. प्रत्येकाला आहे त्या ठिकाणी कांही तरी दु:खच होतं हे खंडूच्या लक्षात आलं. पैसा होता तिथं रोगराई होती. सौंदर्य होतं तिथ वाईट नजर होती. एक ना अनेक गोष्टी. कुणाला मूल नाही तर कुणाची मूलं जगत नाही. त्याला आपल्या नशीबाचे बोल आठवले तसा तो ओरडून म्हणाला, "नकोरे ! नको ! मला नाही बदलायचं माझं नशीब. मीच सर्वात सुखी आहे."

खंडूच्या भोवती जमा झालेली नशीबं आशेनं त्याच्याकडे बघू लागली. तो मात्र आपल्या नशीबाच्या पायाशी बसून माफी मागत होता. "मला माफ कर, मी तुला नको ते बोललो पैसा असला की सगळी सुखं मिळतात असं मला वाटायचं नाही मला तू सोडून जायचं नाही."

खंडू गुहेच्या द्वारातून बाहेर पडला. तो साधू अता मिस्कीलपणे हसत होता. "काय खंडू घेतलास कां नशीब बदलून ?" असं त्यानं विचारलं.

खंडूनं सर्व वृत्तांत त्या साधूला सांगितला आणि म्हणाला, बाबा, आज तुम्ही खरं माझ्या डोळ्यात अंजन घातलंत. मीच स्वत:ला खूप दु:खी समजत होतो. पण आज कळलं की पैसा असूनही अनेक दु:खी जीव या पृथ्वीतलावर आहेत. ' खंडूनं साधूच्या पायाला हात लावला. तेवढ्यात त्याची झोप उडाली आणि प्रत्यक्षात त्याच्या हाताला कुऱ्हाडीचा दांडा लागला. साधू गुहा कांहीच नव्हते डोळ्यापुढे.

पण दुरून त्याच्या कानावर शब्द आले "आहे त्यात सुख मान. जगात पूर्ण सुखी कुणीच नाही .... "

हे शब्द खंडूच्या अंतःकरणाला जाऊन भिडले तसा तो नव्या उत्साहाने उठला आणि भराभर लाकडे तोडू लागला.

● ●

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. नं. २९९९ दिनांक ९८/२/९४
विषय बा. वा. क्र. ........

# :४: एक होता वाघ्या

शेळ्या मेंढ्यांचं लांडग्यापासून रक्षण व्हावं म्हणून विठू धनगरानं एक छानसं कुत्र्याचं पिल्लू पाळलं. नाहो म्हटलं तरी तीन खंडी शेळ्या मेंढरं त्याच्याकडं होती. ' वाघ्या ' विठूच्या अंगाखांद्यावर हळूहळू वाढला. त्याच्या कामात मदत करू लागला. दुसरं एखादं मेंढरू कळपात शिरलं की भूऽऽभूऽऽ करून आपलं कर्तव्य बजावीत होता. विठूचेही त्याच्यावर खूप प्रेम होतं. त्याला दिल्याशिवाय विठू कधी भाकरीला हात लावायचा नाही. दिवस मजेत चालले होते.

विठूच्या लग्नानंतर वाघ्याला मालकीण मिळाली. पण का कुणास ठाऊक, सारजाला कुत्रा ह्या प्राण्याबद्दलच चीड होती. तिने कधीही वाघ्याला कुरवाळलं नाही, की मायेनं भाकरी टाकली नाही. कधी पायात घोटाळलाच तर चक्क त्याच्या पेकाटात लाथ घालायची.

" वाघ्याला भाकरी टाकलीस का ? " विठूच्या या प्रश्नावर ती चिडून म्हणायची ' मी जेवले का ? याची कधी चौकशी नाही करायचे

मेल्या त्या कुत्र्यावरच तुमचा जीव. "

सारजाच्या येण्यामुळे वाघ्याचे सुखाचे दिवस मात्र पालटले. मालकीणीला धडा शिकवायचा त्याशिवाय कांही खरं नाही हे त्याला कळलं.

बालमित्रांनो तुम्हाला गंमत वाटेल. हा वाघ्या काही साधासुधा कुत्तरडा नव्हता ! त्याला दैवी शक्ती प्राप्त होती. त्या शक्तीचा वापर करायचं त्यानं नक्की केलं.

एके दिवशी काय झालं ? विठू आणि सारजा रात्री झोपले होते. वाघ्या त्यांच्या खोलीत आला. दैवी शक्तीच्या साहाय्याने त्यानं आपली कुत्र्याची कातडी उतरवली. आणि विठूला दिली. त्याची माणसाची कातडी स्वत: वाघ्यानं घेतली.

विठू आता झाला वाघ्या कुत्रा आणि वाघ्या झाला विठू !

सारजा मात्र घुऽऽर्र घुऽऽर्र घोरत होती. खरा वाघ्या तिच्याजवळ झोपला. त्याने सारजाला रागानेच जागं केलं, ' ए, उठतेस की नाही ? झोपलीस काय ? मला आताच्या आता गरम भाकरी करून दे. भूक लागलीय ! '

विठू सारजाला असं कधी रागावून बोलायचा नाही. त्यात असं अपरात्री उठून भाकरी करायला सांगतोय याचे आश्चर्य वाटले तिला. कायापालटाचं तिला काय ठाऊक ? रागीट चेहरा बघून ती उठली आणि तीन गरम भाकऱ्या अपरात्री भाजल्या. भाकरी पुढ्यात आणून ठेवल्याबरोबर खऱ्या वाघ्यानं ती भिरकावून दिली, मला नको भाकरी आता, घाल त्या वाघ्याला ' सारजा गोंधळून गेली. पडलेल्या भाकरी उचलून पडवीत बांधलेल्या कुत्र्याला तिनं घातल्या. खरं म्हणजे, वाघ्याच्या रूपात तो विठू म्हणजे तिचा नवराच होता. पण तिला काय माहीत ?

सारजा जवळ आली तसा वाघ्या जोरजो...त शेपटी हलवू लागला. जिभेनं तिचे अंग चाटू लागला. ऊं ऽऽ ऊं ऽऽ असे आवाज काढू लागला. जणू काही त्याला काहीतरी बोलायचं आहे. वाघ्याचं हे वागणं तिला अनपेक्षितच होतं. गोंधळल्यामुळे तिनं त्याच्या पाठीवरून हा त फिरवला.

'ए ! ऊठ तिथून. चल आंत ये. चल झोप आता.' खऱ्या वाघ्या आतून खेकसला.

विठू आणि वाघ्याच्या वागण्यातला बदल बघून तिला आश्चर्यही वाटलं. ती घाबरलीसुद्धा. भीतभीतच तीनं खऱ्या वाघ्याला विचारलं. "काय हो ! तुम्ही आज असे माझ्यावर रागवताय का ? आणि कधी माझ्याजवळ न येणारं ते कुत्र किती माया करतेय बघा !"

खरा वाघ्या म्हणाला 'रात्री उ  त्याला भाकरी घातलीस. ...ावर असलं तरी त्याला जाग आहे. त्यात आपल्या वाघ्या तर खूपच चांगलाय. तू उगाच त्याला चिड चिड करतेस.'

'तू रोज त्याला मायेनं खाऊ घाल मग बघ. मुक्या जनावराला जीव लावला तर तेही लावतात. तुला आठवतं ना ? एकदा तुझा पदर पेटला होता तेव्हा वाघ्यानंच तोंडात धरला तुझ्या जीवावरचा प्रसंग टळला होता.'

सारजाला आपली चूक लक्षात आली. तिनं मनाशी निश्चय केला. "उद्यापासून वाघ्याला भाकरी घातल्याशिवाय मी तोंडात घास घेणार नाही."

तिनं आपला निश्चय पाळला. एक दोन महिने गेले.

खऱ्या वाघ्याला आपली युक्ती लागू पडल्याची खात्री झाली. तो आपल्या रूपातल्या विठूची आता माया करत आहे, यापुढे आपल्याला विठू आणि सारजाचं दोघांचेही प्रेम मिळेल. आपल्या प्रिय

विठूला मात्र दोन महिने कुत्र्याच्या रुपात रहावं लागलं याचं वाईट वाटलं त्याला.

एका रात्री सारजा झोपलेली बघून खऱ्या वाघ्यानं दैवी शक्तीच्या सामर्थ्यानं पूर्ववत् कायापालट केला.

खरा विठू, विठू झाला आणि विठूच्या रुपातला वाघ्या पुन्हा वाघ्या कुत्रा झाला.

वाघ्याच्या ह्या दैवीशक्तीची विठूलाही पूर्ण कल्पना नव्हती. त्यामुळे तो मनातून घाबरला. विठूने सारजाला उठवलं, सगळा प्रकार तिला सांगितला. 'तुझ्या वाईट वागणूकीमुळेच मला त्रास झाला. पण तुला वठणीवर आणण्यासाठीच वाघ्यानं असं केलं असेल हे खरं.'

विठूच्या विक्षिप्त वागण्याचा आणि वाघ्याच्या प्रेमळ वागण्यातला हा फरक का झाला होता हे तिला आता कळलं. दोन महिने आपण आपल्या नवऱ्याला कुत्रा समजून भाकरी घातली याचं तिला वाईट वाटलं. काही का असेना ? वाघ्यानं आपला विठू परत दिला हेच उपकार समजून यापुढ खऱ्या वाघ्याशीसुद्धा मायेनंच वागायचं असा निर्णय घेतला.

विठू म्हणाला, 'सारजा मला जशी मी कुत्रा असतांना तू नियमित भाकरी घातलीस अधूनमधून दूध घातलंस. तशीच वागणूक यापुढे वाघ्याला दे. त्याचा कधीही द्वेष करू नकोस!'

सारजाला आपली चूक लक्षात आली. चांगल्याचं फळ चांगलच मिळतं याचीही प्रचिती तिला आलीच होती. वाघ्याच्या चतुराईचं मात्र दोघांनाही कौतुक वाटलं. वाघ्या जिवीत होता तोपर्यंत सारजा आणि विठू कधीही त्याला भाकरी घातल्याशिवाय जेवले नाहीत.

• •

# :५: माकडाचे बागकाम

झुंबरलाल शेठजींना बागबगीचाचा खूप नाद होता. त्यांनी आपल्या बंगल्यासमोर खूप छान बगीचा केला होता. झुंबरलालची बाग खूप छान होती. ही बाग उत्तम असण्याचं मुख्य कारण, रामा माळीच होता. रामा सर्व झाडांना योग्य ते पाणी देणं, वाळून खाली पडलेली पानं, कचरा उचलून स्वच्छ करणं. फळं, फुलं मालकाच्या घरी पोहचवणं तो प्रामाणिकपणे करीत असे.

एकदा या गावांच्या जवळच्या नवापूर या गावो खूप मोठी जत्रा भरली. विशालपूर गावातली बरीच माणसं नवापूरला जाऊ लागली. तीन दिवसांची ही जत्रा होती.

पण.... रामा माळचाच्या चेह-यावर उदासवाणा, बापुड-वाणा भाव होता. झम्बरलालच्या घरची सारी मंडळी आणि स्वतः शेठजी आपल्या घोडयांच्या बग्गीत बसून नवापूरला सकाळीच गेले.

होते. रामा माळीच उदास का होता ? त्याला जत्रा आवडत नव्हती का ? तर तसं नाही. रामाचं दुःख होतं ते दुःख म्हणजे, प्रत्येक जण आपल्या उद्योगाला सुटी देऊन तीन दिवस मौजमजा करणार होते. पण रामा माळ्याला मात्र तीन दिवसांची सुटी मिळणं शक्य नव्हत. तो जर तीन दिवस बागेत आला नसता तर ? ... तर, बागेत पालापाचोळ्यांचा ढीग पडला असता. नव्यानं लावलेली रोपटी वाळून गेली असती.

रामा माळ्याचं मन जत्रेला जाता येत नाही म्हणून खूप बेचैन झालं. म्हणूनच तो उदासवाणा झालेला. काय करावं अन् काय नाही. ? याचा विचार तो करू लागला. खूप वेळ विचार केल्यावर त्याच्या डोक्यात एक विचार लखखकन् चमकून गेला. तो स्वःतशीच म्हणाला, काय बुदू माणूस मी तरी. आपल्या या बागेत बरीच माकडं राहतात. ही माकडं झाडावरची फळे खातात. उन्हाळ्यात झाडे वाळली तरी इकडंतिकडं फिरून काही खातात आणि मुक्कामाला मात्र आपल्याच बागेत येतात. मी त्यांना कधी हाकललं नाही आणि शेठजींनीही कधी नाराजी दाखवली नव्हती. मी त्यांच्यावर कितीतरी उपकार केले आहेत. मग ही माकडे माझी मदत नक्कीच करतील. त्यांची मदत घ्यायला हरकत काय ?'

या विचाराने रामा खूष झाला. तो झटकन उठला. दोनतीन झाडांवर नेहमी माकडं बसायची तिथे गेला. माकडांच्या टोळीच्या नायकाला म्हणाला. "माकडदादा, आपल्या गावचे खूप लोक शेजारच्या गावी जत्रेला गेली आहेत. माझी जत्रेला जाण्याची खूप इच्छा आहे. पण बागेची काळजी वाटते. तुम्ही माझी मदत कराल का ?'

त्या टोळीनायकाला खूप आनंद झाला. रामानं त्यांना कधीही त्रास दिला नव्हता. त्यानं रामाची मदत करू म्हणून मान्यता दिली.

'तीन दिवस तू निश्चिंतपणे जत्रेला जा' असं म्हटलं. रामाला खूप आनंद झाला. उद्यामारतच रामा आनंदाने नवापूरची वाट कापू लागला. जातांना पुन्हा राम ओरडून म्हणाला, नीट काळजी घ्यारे बाबांनो ! तीन दिवसांनी मी परत येतोच आहे."

माकडं म्हणाली, "अजिबात चिंता करू नका. तुमचे आमच्यावर खूप उपकार आहेत. मदतीची संधी तुम्ही दिली आहे. हे आमचं भाग्यच आहे."

दुसऱ्या दिवशी सकाळी बागेला पाणी घालण्याची वेळ झाली. दहबारा माकडं घागरीने पाणी आणून झाडाला घालू लागली. कुणी पालापाचोळा उचलून बाग स्वच्छ करू लागलं. तेवढ्यात माकडाच्या टोळी नायकानं, सर्व माकडांना बोलावलं आणि म्हणाला, "हे पहा मित्रांनो, झाडाला पाणी कमी पडता कामा नये. प्रत्येक रोपटं उखडून अगदी बुडापासून पाणी द्यायला हवं. मोठ्या झाडांच्या मुळाशी खोदून प्रत्येक मूळाच्या फांदीला पणी मिळाले पाहिजे, तरच माळीदादा आपल्या कामावर खूष होईल."

सर्व माकडांना आपल्या नायकाचं बोलणं बरोबर पटलं. आणि नव्या उत्साहाने ती कामाला लागली. प्रत्येक छोटं झाड, रोपटं उखडून बुडाशी पाणी घालून पुन्हा रोपटी जमिनीत खोचू लागली. दोस्तांनो या मदतीनं बागेची अवस्था कशी झाली हे तुम्हाला कळलंच असेल !

अशी ही मदत सकाळ, संध्याकाळ तीन दिवस लागोपाठ चालू होती. तीन दिवसांनी रामा माळी आनंदानं जत्रेहून परतला. बरोबर झुम्बरलाल शेठजी आणि त्यांचे कुटुंबीय होते. बागेची अवस्था बघून रामाला काहीच सुचेना झुंबरलाल रागाने लाल झाले.क्षणार्धात त्यांनी रामाला नोकरीवरून काढून टाकलं.

सारांश– अधवट ज्ञान असलेल्याची मदत घेणं हे फायद्यापेक्षा तोटयाचंच असतं. अज्ञान्यावर महत्वाची कामगिरी सोपवू नये.

# : ६ : देवीचा न्याय

बालमित्रांनो, विशाल आणि खुशाल हे दोघ. मित्र. एकाच गावात लहानाचे मोठे झाले. दोघांनाही वाटले की आता आपण आपल्या पायावर उभं राहिलें पाहिजे. काही तरी व्यापार उद्योग केला पाहिजे. नशिब अजमावयाला. म्हणून वडिलांच्या सांगण्यावरून दोघेही घराबाहेर पडले. त्याकाळी कांही रेल्वेगाडी किंवा बस नव्हती. हातात हात घालून, झाडं, डोंगर नद्या, असे निसर्गसौन्दर्य पहात, मजल दरमजल करीत दोघांची पायपीट सुरू झाली.

विशाल हा नावाप्रमाणे विशाल मनाचा उदार, सज्जन, उद्योगप्रिय होता तर खुशाल खुशालचेंडू, स्वार्थी, आयतोबा, निरुद्योगी, खोटारडा पण एकत्र असल्यामुळे दोघांची दोस्ती टिकली होती.

सूर्य मावळला होता. अंधार पडू लागला होता. आणि तेवढ्यात विशालच्या पायाला ठेच लागून एक दगड बाजला पडला. पहातो तो

चक्क एका हंड्यात सोन्याची नाणी त्या दगडाखाली पुरून ठेवली होती. दोघांच्याही आनंदाला पारावर उरला नाही. पहिल्या दोन दिवसाच्या प्रवासातच हा अचानक झालेला धनलाभ पाहून दोघांनीही आता सरळ आपल्या गावी परत जाऊन व्यापार करायचा निर्णय घेतला. त्यांची पावलं पुन्हा गावच्या दिशेने पडू लागली.

विशाल म्हणाला ' खुशाल, आपण दोघांनाही हा धनलाभ झाला आहे. आपण तो अर्धा अर्धा वाटून घेऊ आणि व्यापार करू या. "

या सरळ मार्गावर खुशालनं स्वभावाप्रमाणं खोड काढली, 'विशाल असं केलं तर आपली मैत्री इथेच संपेल म्हणून आपण यातली प्रत्येकी शंभर नाणी घेऊ आणि बाकीची नाणी गावाबाहेरच्या वेशीजवळ असलेल्या झाडाखाली पुरून ठेवू. झाडाखालची देवी आपल्या पैशाचं रक्षणही करील. गरज पडेल तेव्हा दोघांनीही येऊन पुन्हा ठराविक नाणी आपण वाटून घेत जाऊ. '

या युक्तीतली खोच विशालला कळली नाही. त्याने ही सूचना मान्य केली. ठरल्याप्रमाणे शंभर शंभर नाणी काढून बाकीची नाणी त्यांनी झाडाखाली पुरून ठेवली.

दोनच दिवसात खुशालने चैन करून आपलं पैसे संपवले. त्यांनी पुन्हा शंभर शंभर नाणी वाटून घेतली आणि उरलेली सहाशे नाणी पुरून ठेवली.

विशालचा व्यापार जोरात सुरू झाला होता. खुशाल मात्र सर्व धन मौज मजा करण्यात उडवीत राहिला त्याची शंभर नाणी संपली व त्याच्या मनात दुष्टविचार येऊ लागले. तो अस्वस्थ झाला. एकदा वाईट विचार आला की तो सहसा डोक्यातून जात नाही.

चांगला अंधार पडल्यावर एके दिवशी खुशाल झाडाकडे गेला. त्यानं तो नाण्याचा हंडा काढला. उरलेली सहाशे नाणी घेतली. हंडा पुन्हा पुरून ठेवला. जमीन सारखी केली, घरी गेला.

दुसऱ्या दिवशी विशालला, ' अजून दोनशे नाणी वाटून घेऊ असे म्हणाला. दोघेही झाडाकडे गेले. खुशालने जमीन उकरली आणि जणू-कांही आपल्याला काहीच माहिती नाही असे दाखवित आश्चर्याने ओरडला, ' विशाल इथे फक्त हंडाच आहे. नाणी कुठं गायब झाली? तुझ्या माझ्याशिवाय हे रहस्य कोणालाच ठाऊक नाही. ' त्यानं सरळ आरोप केला ' तुच-तूच ही नाणी चोरली आहेस '.

विशालला काहीच कळेना. त्याने शपथ घेऊन ' मी नाणी घेतली नाही ' असा पटवण्याचा प्रयत्न केला.

खुशाल म्हणाला, ' तू नाणी दिली नाही तर मी पंचाकडे फिर्याद करतो. '

दोघांचं भांडण शेवटी पंचाकडे गेलं इथही खुशालनं एक युक्ती केली. तो म्हणाला 'झाडाखालची देवी खरा न्याय देईल तिलाच आमचं रहस्य माहित आहे. उद्या सकाळी आपण देवीकडे न्याय मागू या.'

विशाल बेचैन झाला. खुशालही घरी आला. आपल्या वडिलांना म्हणाला, "बाबा, मी अडचणीत आहे. मला तुमची मदत हवी आहे. उद्या पहाटेच जाऊन तुम्ही देवीचं झाड आहे ना ? त्याच्या मागच्या ढोलीत लपून बसा. विशाल चोर आहे असा न्याय द्या"

वडिलांनी प्रथम त्याला समजावलं, नकार दिला पण शेवटी आपला मुलगा चोर ठरला तर आपलही नांव बद्दू होईल. म्हणून ते तयार झाले.

दुसऱ्या दिवशी विशाल, खुशाल, पंच आणि गावातली मंडळी काय होतय हे पहायला झाडाजवळ जमलो.

"देवी तू न्याय दे, इथली नाणी कुणी चोरली ?" खुशाल.

विशाल चोर आहे " अेवढेच शद्ब सर्वांनी ऐकले, सर्वांनाच खूप आश्चर्य वाटले. विशाल चोरी करणं शक्य नाही. अशी सर्वांची खात्री होती. पण देवीचा न्याय शेवटचा मानायचा हे ठरलं होतं. सगळयांची बोटं आश्चर्याने तोंडात गेली.

या वेळात विशालनं जवळपासचं गवत, काटक्या, चिपाडं असं साहित्य जमवलं. झाडाच्या मागच्या बाजूला ठेवलं आणि ते दिलं पेटवून.

विशाच्या या वागण्याचा अर्थ कुणालाच लागेना.

आगीचा डोंब उसळला तसा झाडाच्या ढोलीत बसलेला खुशालचा बाप "मेलो, मेलो" असे ओरडतच बाहेर आला.

देवीच्या आवाजाऐवजी पुरूषाचा आवाज आला तेव्हाच मला सगळा प्रकार लक्षात आल्याचं विशालनं सर्वांना सांगितलं. खुशाल मात्र खजील होवून खाली मान घालून उभा होता. मित्र असून-विशालसारख्या सज्जनाला चोर ठरवल्याबद्दल पंचानी त्याला दूषणं दिली. स्वत:बरोबर माझही नांव बदनाम केलं म्हणून वडीलही ओरडले.

विशालच्या हुशारीचं सर्वांनी कौतुक केलं. सहाशे नाणीही बक्षीस म्हणून विशाललाच मिळाली. खुशाल आणि त्याला खोटेपणात साथ करणाऱ्या त्याच्या बापाला पंचानी गावाबाहेर हाकलून दिलं.

● ●

# : ७ : बदल

शाळेतल्या डबल बारवर व्यायाम करायला झोका खेळायला अधून मधून जात असे. सायंकाळी माझ्यासारखी व्यायामप्रेमी मुलं शाळेत यायची. आळीपाळीनं आम्ही झोका खेळत असायचे. डबल बारवर जोर काढून दंडात गोळे आणून बघायचे.

एके दिवशी काशिनाथ हा गावच्या पाटलाचा मुलगा अचानक शाळेत आला. आम्हा मुलांचा व्यायाम, झोका खेळणं चालू होतं काशिनाथ तसा उडाणटप्पू आणि उनाड होता. शिक्षकांचंही त्याच्यावर प्रेम नव्हतं. अभ्यासातही तो 'मागच्या बाकावरचा' विद्यार्थी होता. पाटलाचा मुलगा या भितीने त्याला कुठल्या वर्गात नापास करण्याचं धाडस कुण्या शिक्षकाला झाले नाही म्हणून तो ९ व्या वर्गापर्यंत पोचला होता. मी कधी काशीनाथच्या वाटेला स्वतःहून जात नसे.

त्या दिवशी माझं डबल बारावर जोर काढणं चालू होतं. काशिनाथ सरळ माझ्याजवळ आला आणि म्हणाला, "रम्या, बाजूला हो.

डबल बार मी खेळणार आहे."

मी शांतपणे म्हटलं, "हे पहा आता माझी पाळी चालू आहे. माझं झाल्यावर तू खेळ."

काशिनाथने काही एक न ऐकता खाडकन माझ्या गालफाडात लगावली. त्यासरशी मलाही राग आला. काशीनाथचा उद्धटपणा पाहून माझ्याबरोबर नियमित व्यायामाला येणारी दोस्त मंडळी पुढं सरसावली. माझा चेहरा रागाने लाल झाला होता. अनपेक्षितपणे माझ्या मित्रांनी काशीनाथवर हल्ला केला.

सगळ्यांनी मिळून काशीनाथला जाम बुकलून काढलं.

काशिनाथ मुकाटयाने तिथून गेला. पण, माझ्याबद्दल त्याच्या मनात अढी बसली. जातांना तो पाटलाच्या स्टाईलने मिसरूड नसलेल्या ओठांवर बघून घेईन या अर्थानं हात फिरवून गेला होता.

आपणहून त्याची कड काढायची नाही असं मी मनाशी ठरवलं. पण पुन्हा काशीनाथ रस्त्यात दिसला तर त्याच्या डोळ्यातला रागीट भाव मला दिसायचाच. मी दुर्लक्ष करून जायचो.

आमच्या गावी नळ नाहीत. पाण्याला पाटलाच्याच शेतात विहिरीवर जावं लागायचं. अधुनमधून आई कंटाळली म्हणजे मीही घागर घेऊन विहिरीवर पाण्याला जात असे.

मी असाच पाण्यासाठी काशीनाथच्या विहिरीवर गेलो होतो. विहिरीला अठरा वीस पायऱ्या होत्या. शांत दुपारची वेळ. मी पायऱ्या उतरून विहिरीत उतरलो. घागर बुडवायला म्हणून खाली वाकतो तोच धप्पकन पाण्यात आवाज झाला. पहातो तो काशीनाथ पाण्यात पडला होता. वाचवाऽ वाचवाऽ म्हणून ओरडत होता. त्याला पोहता येत नव्हतं.

क्षणभरात माझ्या मनातला वैरभाव नष्ट झाला. मी कपड्यासरशी पाण्यात उडी घेतली. केसाला धरून खेचत खेचत काशीनाथला पायरी पर्यंत आणलं. काशिनाथ पाण्यात पडला कसा ? याचं आश्चर्य माझ्या चेहऱ्यावर होते, तर वरमल्याचे भाव काशिनाथच्या डोळ्यात होते.

काशिनाथ वर आला. त्याच्या डोळ्यात पाणी भरलं. त्यानं चक्क माझे पाय धरले. "रमेश, मला माफ कर ! माफ कर !" वारंवार म्हणू लागला

"रमेश, त्या दिवशी शाळेत तुझ्यामुळे मला तुझ्या दोस्तांनी बदडलं होतं. त्याचा बदला घेण्यासाठी मी तुला मारायचं मनाशी ठरवलं होत. आज तुला पाण्याला येताना बघितलं आणि तुझ्या मागावर मी आलो. पावलांचा आवाज न होऊ देता मी तुझ्या मागोमाग विहिरीच्या पायऱ्या उतरलो. तुझ लक्ष नव्हतं. मी तुला जोराने ढकलणार इतक्यात तू पाण्यासाठी खाली वाकलास. माझा तोल गेला आणि मीच पाण्यात पडलो. तू मला वाचवलंस. मी तुझे उपकार कसे फेडू ?'

मला सर्व प्रकार कळला. काशीनाथला त्याच्या दुष्टबुद्धीचे फळ मिळालं होतं. मी एवढच म्हणालो. "काशीनाथ या पुढे तू वाईट बुद्धीने वागू नकोस म्हणजे झालं मी तुझ्यावर उपकार केले नाहीत. बुडत्याला वाचवणं हे माझं कर्तव्यच मी केलं."

काशिनाथाच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. मी दोस्तीसाठी पुढं केलेला हात त्यानं घट्ट दाबला. तेव्हापासून काशीनाथमध्ये बदल झाला. तो सुद्धा एक गुणी विद्यार्थी म्हणून चमकला त्याची माझी दोस्ती पक्की झाली. सद्गुणानेच दुर्गण टाळता येतात हे मला कळलं ते तेव्हा.

• •

# :८: कलींगडाची गोष्ट

लक्ष्मीधर नावाचे एक व्यापारी होते. खूप श्रीमंत. त्यांना एक मुलगा होता. गणपत त्याचे नाव. खूप लाडात वाढल्यामुळे तो शेफारला होता. हट्टी दूराग्रही झाला होता. तेवढाच आळशी ऐतखाऊ बनला होता.

गणपत वीस वर्षाचा झाल्यावर आईने त्याच्या लग्नाचा विषय काढला. तसे लक्ष्मीधर म्हणाले–

पैसा कमावण्याचो अक्कल नाही. लग्न कशाचं करायचे. त्याची मी परीक्षा घेतो. त्यात पास झाला तर पुढच्या गोष्टी.

आईने गणपतला बोलावले लक्ष्मीधर त्याला म्हणाले. ' गणपत तुला बद्धो आहे को नाहो हे पाहण्यासाठी मी एक रुपया तुला देत

आहे. या रुपयात तू अशी वस्तू आणून दाखव की माणूस खाऊ शकेल, जनावर खाऊ शकेल, बागेत पेरायलाही तिचा उपयोग होईल.

गणपत बाजारात गेला. अनेक वस्तू त्याने पाहिल्या. पण त्या सगळ्या एक रुपयात येणे शक्य नव्हत्या. एक माणसाला खाता येत असली तर पेरायला उपयोगाची नव्हती. पेरायच्या उपयोगाची असेल तर जनावराला खायला उपयोगाची नव्हती. काय करावं ? गणपत चिंताक्रांत होऊन बसला. विचार करू लागला.

गणपतचा कधीच काळजीत नसलेला चेहरा आज चिंतेत पाहुन त्याच गावातली एक शेतकऱ्याची मुलगी गणपतजवळ आली. काळजीचे कारण विचारले. गणपतने सर्व हकीगत सांगितली.

सगुणा खूप हुशार होती. तिने क्षणभर विचार केला, म्हणाली, ' आणा तो रुपया इकडे. ' रुपया घेऊन बाजारात गेली आणि कलींगड घेऊन परतली. गणपतच्या हवाली कलिंगड देऊन म्हणाली, ' या एक रूपयाला चार आणे कमीच्या वस्तूत तुमच्या बापाला हव्या असलेल्या सर्व वस्तू आहेत. आता घरी जा. '

गणपतने तिला विचारले, ' मला सर्व वस्तू यात कशा आहेत ते सांगशील का ? '

सगुणा म्हणाली, ' कलींगड फोडले की त्याच्या आतला लाल लाल गर माणसाला खायला झाला. साली जनावर खाऊ शकतात. आणि नदीकाठच्या बागेत बी पेरलं की उपयोग होईल '

गणपतला आनंद झाला. तो घरी गेला. लक्ष्मीधर आणि आईला कलींगड दिले. शिवाय रुपयातले चार आणे उरले होते तेही दिले.

लक्ष्मीधरला वाटले हे कांही गणपतचे डोके नव्हे. त्यांनी विचारले, ' खरं सांग ही वस्तू आणायचे तुला कुणी सुचवलं ? '

गणपत भोळा असल्याने त्याने सगुणाचे नांव सांगितले.

लक्ष्मीधर पत्नीला म्हणाले, ' बघितलंस ही कांही गणपतची बुद्धी नाही. मला वाटते ही हुशार सगुणाच गणपतचा संसार छान करूं शकेल. '

गणपतच्या आईला हे बोलणे पटले. लक्ष्मीधराने शेतकऱ्याकडे मागणी घालून सगुणाचे आणि गणपतचे लग्न थाटात लावून दिले.

सगुणाला हुशारीमुळे सर्व वैभव मिळाले. तिजोरीच्या चाव्या आता तिच्या कमरेला लटकू लागल्या होत्या. गणपतच्या आईचेही तिच्यावर प्रेम होते.

● ●

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २८९८ दिनांक १८/३/८४
विषय बा. पो. क्र. ........
BVBK-0402919